# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# विशेष बातमीपत्र
# कोरोना महाराष्ट्र
# सकाळी 10 वाजून 10 मि.

दिनांकः 27.01.2022 वारःगरुवार

---

**देशाच्या अनेक भागांमध्ये कोरोनाची रुग्ण संख्या वाढत असल्यामुळे, आम्ही श्रोत्यांना आवाहन करत आहो की त्यांनी दक्ष राहावं आणि संपूर्ण लसीकरण करुन घ्यावं तसंच 15 ते 18 वर्षे वयाच्या मुलांसह इतरांना लस घेण्यात मदत करावी. कोरोना विषाणूच्या ओमीक्रॉन या नवीन प्रकारामुळं चिंता निर्माण झाली असल्यानं मुखपट्टी, सुरक्षित अंतर आणि हात तसंच चेहऱ्याची स्वच्छता या तीन सोप्या उपायांचं पालन करावं. कोविडसंबंधी कोणतीही माहिती आणि मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक 011- 23 978 046 आणि 1075 या क्रमांकांवर संपर्क साधावा.**

---

1. कोरोनाचा समर्थपणे सामना केल्याबद्दल राज्यपालांद्वारे सर्वांचं कौतुक
2. विद्यार्थ्यांचं शैक्षणिक हित लक्षात घेऊन पहिली ते पाचवी पर्यंतचे वर्ग 1 फेब्रुवारीपासून सुरू करण्याचा राज्य सरकारचा मानस
3. राज्यात काल 35 हजार 756 नवीन कोरोनाबाधित. तर 39 हजार 857 रुग्ण कोरोनामुक्त आणि
4. अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पाठोपाठ जिल्हा स्त्री रुग्णालयातही कोरोनाचा शिरकाव

<u>राज्यपाल कोविड</u>

गेल्या दोन वर्षांपासून कोविडशी मुकाबला करीत असतांना अर्थचक्र थांबू न देता, केवळ गर्दीवर निर्बंध घालण्याचे राज्य सरकारचे नियोजन देशात वैशिष्ट्यपूर्ण ठरले. कोविडचा नियोजनबद्धरित्या मुकाबला केल्याबद्दल माननीय सर्वोच्च न्यायालयानं 'मुंबई मॉडेल' चे कौतुक केलं असल्याचा उल्लेख करत राज्यपालांनी कोरोना संकटाचा समर्थपणे सामना करत असलेल्या महाराष्ट्राचं कौतुक केलं.

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज मैदान इथे आयोजित मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मुंबई उच्च न्यायालय, नीती आयोग तसेच जागतिक आरोग्य संघटनेने देखील महाराष्ट्राने केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली आहे. हे यश केवळ प्रशासनाचे

नसून फ्रंट लाईन वर्कर्स, डॉक्टर्स, पोलीस, स्वच्छता कर्मचारी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे आहे असंही त्यांनी नमूद केलं.

**<u>1ली ते 5वी शाळा-जालना</u>**

विद्यार्थ्यांचं शैक्षणिक हित लक्षात घेऊन पहिली ते पाचवी पर्यंतचे वर्ग 1 फेब्रुवारीपासून सुरू करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी काल दिली. जालना इथं प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमावेळी ते बोलत होते. ब्रिटन आणि फ्रान्सच्या पंतप्रधानांनी, 'आता आपल्याला कोरोना बरोबर राहायचं आहे' असं म्हटलं आहे. त्यामुळे या देशांपासून बोध घेऊन आगामी काळात कृती दल आणि केंद्र सरकारच्या सूचनांचं पालन केलं जाईल असंही टोपे यावेळी म्हणाले.

राज्य, समाज आणि स्वतःच्या सुरक्षीततेसाठी नागरीकांनी दुसऱ्या डोसचं लसीकरण करून घ्याव असं आवाहन देखील टोपे यांनी केलं. कोरोनामुळे राज्याच्या तिजोरीवर आर्थिक ताण आल्याची कबुली देत, कोरोनामुळे निर्बंध लावण्यात आल्यानं उद्योजकांचं नुकसान होत आहे, तसंच महसूल देखील कमी प्रमाणात जमा होत असल्याचं टोपे म्हणाले. नागरीकांनी कोरोना लसीकरण करून घेऊन कोरोना नियमांचं पालन केल्यास आपण लवकर कोरोनावर मात करू असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

<u>राज्य आकडेवारी</u>

राज्यात काल 35 हजार 756 नवीन कोरोनाबाधित आढळले. तर 39 हजार 857 कोरोना रुग्ण काल बरे झाले. त्यामुळे राज्यात आतापर्यंत या आजारातून बरे झालेल्या रुग्णांची एकंदर संख्या 71 लाख 60 हजार 293 झाली आहे. सध्या राज्याचा रुग्ण बरे होण्याचा दर 94 पूर्णांक 15 शतांश टक्क्यांवर आला आहे. कोविड-19 मुळे काल 86 रूग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून सध्या राज्याचा कोविड मृत्यू दर एक पूर्णांक 87 शतांश टक्के आहे.

राज्यात सध्या 2 लाख 98 हजार 733 कोरोनाबाधित रुग्ण रुग्णालयात उपचार घेत आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक 92 हजार 973 रुग्ण उपचाराधीन आहेत. त्याखालोखाल नागपूर जिल्ह्यात 29 हजार 152 उपचाराधीन रुग्णसंख्या आहे. 27 हजाराहून जास्त रुग्णसंख्या असलेला ठाणे जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असून, 22 हजार 364 उपचाराधीन रुग्णसंख्या असलेला मुंबई जिल्हा चौथ्या क्रमांकावर आहे. राज्यात उपचाराधीन रुग्णांची संख्या तुलनेने हिंगोली जिल्ह्यात सर्वात कमी असली तरी हिंगोली जिल्ह्यात सध्या 920 रुग्ण उपचार घेत आहेत.

राज्यात काल एकही ओमिक्रॉनबाधित रुग्ण आढळला नाही. राज्यात आतापर्यंत 2 हजार 858 ओमिक्रॉनबाधितांची नोंद झाली आहे.

**<u>अकोला बाधित</u>**

अकोला इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पाठोपाठ जिल्हा स्त्री रुग्णालयातही कोरोनाचा शिरकाव झाला आहे. प्राप्त माहितीनुसार जिल्हा स्त्री रुग्णालयातील सुमारे तेवीस डॉक्टर, परिचारिकांचा rt-pcr चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. या सर्वांना सौम्य लक्षणे असल्याने ते गृहविलगीकरणात आहेत. कोरोनाची स्थिती नियंत्रणात असताना जानेवारीच्या सुरुवातीला अकोला जिल्ह्यात कोविड-19 रुग्णांची संख्या वाढू लागली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालयातही कोरोनाचा शिरकाव झाला होता. इथे सुमारे पन्नास वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी पॉझिटिव्ह आढळले होते. जीएमसीतील अधिकारी-कर्मचारी कोविडमुक्त होतात तोच जिल्हा स्त्री रुग्णालयातही कोरोनाचा शिरकाव झाल्याचं समोर आलं आहे.

**<u>अमित देशमुख</u>**

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत रुग्णसंख्या वाढलेली दिसत असली तरी रुग्णांमध्ये सौम्य प्रकारची लक्षणे आढळत आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेसारखी तणावाची स्थिती नाही. तसंच कोरोना प्रतिबंधक लसीकरणामुळे सुरक्षा कवच लाभलेलं आहे. आजची रुग्णसंख्या ही महिनाभरात कमी होऊ शकते तरी नागरिकांनी कोरोना प्रतिबंधक मार्गदर्शक सूचनांचं तंतोतत पालन करावं असं आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी मंगळवारी औरंगाबाद इथं केलं.

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमधली शासकीय वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयातील कोरोना रुग्णसंख्या, सेवासुविधा आणि उपाय योजनाबाबतची आढावा बैठक औरंगाबादच्या घाटी रुग्णालयाच्या सभागृहात झाली. त्या बैठकीत देशमुख बोलत होते.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयांनी कोरोना काळात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेली असून ही महाविद्यालयं आणि रुग्णालयांमध्ये पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीनं पदभरती प्रक्रिया वेळेत राबवावी अशा सूचनाही देशमुख यांनी यावेळी दिल्या.

**<u>पालघर-ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प</u>**

पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते मंगळवारी, पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या उपजिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचं लोकार्पण करण्यात आलं.

भुसे यांनी जिल्हा ऑक्सिजनच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावा यासाठी पालकमंत्र्यांनी जिल्हा नियोजन समिती मार्फत विशेष निधी राखीव ठेवण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले होते. या निधीच्या माध्यमातून हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यातल्या इतर रुग्णालयांमध्ये देखील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहेत.

**<u>पुणे परवानगी</u>**

पुणे शहरातील सर्व जलतरण तलाव, खुली मैदानं, उद्यानं सुरू करण्यास नुकतीच परवानगी देण्यात आली आहे. पुण्यातली उद्यानं सकाळी 6 ते 9 या वेळेत सुरू राहणार आहेत. कोरोनाच्या

पार्श्वभूमीवर या सर्व ठिकाणी मास्कचा वापर, सुरक्षित अंतर, तसंच दोन मात्रांसह संपूर्ण लसीकरण, तसंच स्वच्छतेबाबतच्या नियमांचं पालन करणं बंधनकारक आहे.

राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि प्रशिक्षक यांच्या सरावासाठी जलतरण तलाव सुरू राहणार असल्याचं पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रविंद्र बिनवडे यांनी काढलेल्या आदेशात नमूद केलं आहे.

**भरणे शाळा सूचना**

सोलापूर जिल्ह्यात कोरोना रूग्णांची संख्या वाढत असल्यानं प्रशासनानं शाळा सुरू करण्याचा निर्णय आठ दिवसांनी घ्यावा, अशा सूचना संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या आहेत. ते मंगळवारी सोलापूर इथं कोरोनाविषयक आढावा बैठकीत बोलत होते. सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही रूग्णसंख्या वाढत आहे, त्यामुळे कुणीही गाफील राहू नये. कोरोना चाचण्यांचं प्रमाण वाढवावं, लसीकरणाचा वेग वाढवावा, अशा सूचनाही भरणे यांनी बैठकीत दिल्या.

**पाटील पॉझिटीव-कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील कोरोना पॉझिटिव्ह झाले आहेत. त्यांनी सोशल मीडियावरून याबाबत माहिती दिली आहे. प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम त्यांच्या उपस्थितीत झाल्याने त्यांनी संपर्कात आलेल्या सर्वांना कोरोना चाचणी करून घेण्याची विनंती केली आहे.

**सोलापूर- लसिकरण आवाहन**

कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अन्तर्गत लसीकरण ही एक महत्वाची बाब असून प्रत्येक नागरिकाने लसीकरण करून आपला जिल्हा आघाडीवर ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावं असं आवाहन सोलापूर जिल्ह्याचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल केलं. लसीकरणास पात्र नागरिकांपैकी 85 टक्के नागरिकांनी लसीची पहिली मात्रा घेतली असून 55 टक्के नागरिकांनी लसीच्या दोन्ही मात्रा घेतल्या आहेत तसंच सोलापूर जिल्ह्यातील 15 ते 18 वयोगटातील अडीच लाख विद्यार्थ्यांनी लसीची पहिली मात्रा घेतली असल्याची माहिती भरणे यांनी दिली.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं कोरोना महाराष्ट्र हे विशेष बातमीपत्र संपलं नमस्कार.